अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । मंगळवार
२९.०९.२०२६

वरुड **दर्पण**
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

वर्ष: ०७ | अंक: २४० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
+91 7745067712

# नुकसानग्रस्त शेतीच्या पंचनाम्यावर शेतकऱ्याची स्वाक्षरी घेणं बंधनकारक

## कृषी विभागाकडून राज्यभरातील कृषी अधिकाऱ्यांना पत्र

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***मुंबई*** – राज्यातील दुष्काळ सदृश्य स्थितीच्या पार्श्वभूमीवर एक मोठी बातमी समोर आली आहे. एकीकडे राज्यभरात कृषी विभागाकडून नुकसानग्रस्त शेतीचे पंचनाम्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

असे असताना या संदर्भात कृषी आयुक्तालयाने राज्यभरातील कृषी अधिकाऱ्यांना पाठवलेल्या सूचनांमध्ये करण्यात येणाऱ्या कृषी पंचनाम्यावर शेतकऱ्याची स्वाक्षरी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहे. या संदर्भातला प्रपत्रही (प्रोफार्मा) ही कृषी विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे.

दरम्यान, फर्स्ट ट्रिगरनुसार ज्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्या ठिकाणी पंचनामा करताना प्रत्येक शेतकऱ्याचे फार्मर आयडी (ॲग्री स्टॅक कार्ड) घेण्यात यावे, ज्यांच्याकडे फार्मर आयडी नसेल त्यांचा आधार कार्ड नुकसानीच्या पंचनाम्यासाठी ग्राह्य धरण्यात यावं, असेही निर्देश देण्यात आले आहे.

पंचनामा पूर्ण केल्याबद्दल शेतकऱ्याची स्वा-क्षरी घेणे ही बंधनकारक मिळालेल्या माहितीनुसार, पंचनामा अहवाल संबंधित विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून लवकरात लवकर कृषी आयुक्तालयात सादर करण्यात यावा, असे निर्देशही या पत्रात देण्यात आले आहे. कृषी विभागाने या संदर्भात प्रसिद्ध केलेल्या प्रपत्र मध्ये शेतकऱ्याचे नाव, त्याचे बाधित पीक, नुकसान झाल्याची टक्केवारी, फार्मर आयडी किंवा आधार क्रमांक, शेतकऱ्याच्या बँक खात्याची सर्व माहिती यासह सर्वात अखेरीस पंचनामा पूर्ण केल्याबद्दल शेतकऱ्याची स्वाक्षरी घेणे ही बंधनकारक करण्यात आले आहे.


निर्णयामुळे पंचनाम्यात पारदर्शकता, शेतकऱ्यांकडून निर्णयाचे स्वागत अस्मानी संकटात शेतकऱ्यांचे या पूर्वीही नुकसान होत होते आणि कृषी विभागाकडून पंचनामे केले जात होते.

# ‘ट्रिगर’मध्ये न बसलेल्या तालुक्यांतही पीक नुकसानीनुसार मदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

## ‘ग्राउंड ट्रूथिंग’द्वारे प्रत्यक्ष नुकसानीची पाहणी करणार

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – दुष्काळाच्या मदतीसाठी ‘ट्रिगर-१’च्या निकषात न बसलेल्या, मात्र पिके करपलेल्या तालुक्यांमध्ये ‘ट्रिगर-२’मधील काही निकषही लागू होत नसतील, तरी प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून मदत देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे.

त्यासाठी संबंधित तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर ‘ग्राउंड ट्रूथिंग’ करण्यात येणार असून, पिकांची करपलेली अवस्था प्रत्यक्ष पाहून दुष्काळाचे सर्व लाभ देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली.

मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. फडणवीस म्हणाले, यंदा पहिल्या दोन महिन्यांत मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला, तर त्यानंतरच्या दोन महिन्यांत पाऊस झाला नाही. अशा प्रकारची स्थिती सामान्यपणे निर्माण होत नाही.

त्यामुळे पारंपरिक निकषांमध्ये काही तालुके बसत नसले तरी प्रत्यक्ष पिकांचे नुकसान झाले असल्यास शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

या प्रक्रियेत मंत्रिमंडळाने मराठवाडा, विदर्भ किंवा इतर कोणत्याही विभागापुरते मर्यादित न ठेवता संबंधित तालुक्यांतील परिस्थिती जाणून घेण्याची जबाबदारी मंत्रिमंडळ उपसमितीवर सोपवली आहे. उपसमितीने प्रत्येक ठिकाणी परिस्थितीची माहिती घेऊन त्याचे निरीक्षण करायचे आहे.

तांत्रिक बाबींमुळे एखाद्या शेतकऱ्याचे नुकसान झाले असूनही तो मदतीच्या निकषात येत नाही, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी विशेष बाब म्हणून या पद्धतीला मान्यता देण्यात आली आहे. या संपूर्ण प्रक्रियेचे निरीक्षणही उपसमिती करणार आहे. तालुका हा एकक मानून सरासरी काढल्यामुळे काही ठिकाणी प्रत्यक्ष नुकसान लपून राहण्याची शक्यता असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

एखाद्या तालुक्यातील एक-दोन मंडळांची सरासरी जास्त असल्यामुळे संपूर्ण तालुक्याची सरासरी वाढू शकते. त्यामुळे आता केवळ तालुका पातळीवरच नव्हे, तर मंडळ पातळीवरही परिस्थितीची पाहणी करण्यात येणार आहे. संबंधित तालुक्यांमध्ये मंडळ स्तरापर्यंत जाऊन ही प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पंचनाम्यावर शेतकऱ्याची स्वाक्षरी असणार का, असा प्रश्न विचारण्यात आल्यानंतर फडणवीस यांनी पंचनामा प्रक्रिया प्रतिबंधात्मक ठरू नये, असे स्पष्ट केले. पंचनामा कसा झाला आहे, याची माहिती शक्यतो शेतकऱ्याला मिळाली पाहिजे, असा सरकारचा प्रयत्न आहे. मात्र, अनेक वेळा पंचनामा करताना शेतकरी प्रत्यक्ष ठिकाणी उपस्थित नसू शकतो. त्यामुळे अशा विविध परिस्थितींचा विचार करून योग्य निर्णय मंत्रिमंडळ उपसमिती घेईल, असे त्यांनी सांगितले.

# सिया गोयलचं शाळेतलं प्रेमप्रकरण, एक्स बॉयफ्रेंडने पोलिसांना सगळं सांगितलं

## ‘केतननं माझ्यासाठी काय गिफ्ट आणलंय?’... मृत्यूनंतर सियाचा मेसेज : आरोपपत्रात मोठा खुलासा

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***पुणे*** – लोणावळा येथील केतन अग्रवाल हत्या प्रकरणाच्या आरोपपत्रातून आणखी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. केतन सियाला एक खास बर्थडे गिफ्ट देणार होता. यासंदर्भात केतनच्या बहिणीने मोठा खुलासा केला आहे. पोलिसांनी या प्रकरणी ५००० हून अधिक पानांचा चार्जशीट दाखल केला आहे.

केतनचं सियासाठी होतं खास बर्थडे गिफ्ट केतनच्या पाठीवर त्याची होणारी पत्नी सिया हिच्या नावाचा टॅटू असल्याचा उल्लेख आरोपपत्रात करण्यात आला आहे. केतनची बहीण संजना अग्रवाल हिने दिलेल्या जबाबानुसार, तिला केतनच्या मोबाईलमध्ये हा टॅटू असलेला फोटो आढळला होता. त्यानंतर तिने व्हिडिओ कॉलद्वारे सियाला हा फोटो दाखवल्याचे जबाबात नमूद आहे. लोहगड किल्ल्यावर केतनचा मृत्यू झाल्यानंतर पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रात संजनाच्या जबाबाचाही समावेश आहे.

आरोपपत्रानुसार, केतनच्या मृत्यूनंतर संजनाने त्याचा मोबाईल तपासला. त्यावेळी तिला केतनच्या पाठीवर इंग्रजीमध्ये ‘सिया’ नावाचा टॅटू असलेला फोटो सापडला.

संजना हिच्या म्हणण्यानुसार, १९ जून २०२६ रोजी सिया आपल्या आई-वडिलांसह आणि नातेवाईकांसोबत केतनच्या घरी आली होती. त्यावेळी हा फोटो तिला प्रत्यक्ष दाखवता आला नाही.

त्यानंतर सिया घरी गेल्यावर संध्याकाळी सुमारे ७:३० वाजता तिचा संजनाला व्हॉट्सॲप मेसेज आला. सियाने केतनने तिच्यासाठी काय गिफ्ट आणले आहे, अशी विचारणा केली होती. यावर संजनाने नंतर फोन करण्याचे सांगितले.

# ‘सारथी’ला १२२ कोटी, अण्णासाहेब पाटील महामंडळाला १५० कोटी

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा आणि वसतिगृहांची उभारणी करण्यासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थेला (सारथी) १२२ कोटी ३४ लाख ६० हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळासाठी १५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार हा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मंगळवारी दिली. सारथीच्या माध्यमातून मराठा समाजातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना विविध शैक्षणिक आणि सामाजिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. सारथीच्या वसतिगृहांच्या बांधकामासाठी १२२ कोटी ३४ लाख ६० हजार रुपयांचा निधी मंजूर करण्याचा शासन आदेश निर्गमित करण्यात आल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी राज्यात ५०० विद्यार्थी आणि ५०० विद्यार्थिनींच्या क्षमतेची आठ वसतिगृहे उभारण्यात येत आहेत. वसतिगृहांचे बांधकाम सध्या पूर्णत्वास जात असून, पुढील शैक्षणिक वर्षापासून ती विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात येत असल्याचे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.




# इंडिया आघाडीची एसआयआरवर उद्या बैठक, ज्ञानेश कुमार हटाव मोहिमेला आणखी जोर येणार

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



***मुंबई*** _ इंडिया आघाडीची एसआयआर आणि निवडणूक आयोगातील मतभेदांसंदर्भात विरोधी पक्षांच्या रणनीतीवर उद्या (३० सप्टेंबर) बैठक होणार आहे.

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव या बैठकीला उपस्थित राहणार नाहीत. त्यांच्या जागी पक्षाचे दुसरे नेते उपस्थित राहतील. शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी होतील. पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी सांगितले की, ४ ऑक्टोबर रोजी ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात होणाऱ्या मोर्चाच्या तयारीत व्यस्त आहे. शिवसेना अभिजित दिपके यांना सुद्धा पाठिंबा देणार असल्याचे राऊत यांनी म्हटलं आहे.

इंडिया आघाडीची बैठक जवळपास साडेतीन महिन्यांनंतर होत आहे. यापूर्वी ८ जून रोजी झालेल्या बैठकीत २३ पक्ष सहभागी झाले होते.



दर्पण



# आम्ही कुणाही पक्षात सहभागी होणार नाही : शरद पवारांचा अजित पवार गटाला इशारा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बाबत विविध प्रकारच्या चर्चा सुरू असतात. परंतु, अशा कोणत्याही चर्चेला काही अर्थ नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बाबत विविध प्रकारच्या चर्चा सुरू असतात.

परंतु, अशा कोणत्याही चर्चेला काही अर्थ नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्रात भक्कमपणे काम करत असून ज्याला कोणाला यायचं आहे, त्यांनी आमच्यात यावे. आम्ही कुणाच्या सहभागी होणार नाही, अशा स्पष्ट इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी सोमवारी अजित पवार गटाला दिला.

यामुळे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाची शक्यता निकाली निघाल्याचे मानले जात आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या राज्य कार्यकारिणीची बैठक चव्हाण प्रतिष्ठानमध्ये झाली. बैठकीत दुष्काळी



परिस्थितीबाबत चर्चा झाली. पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना पवार यांनी पक्ष अजित पवार गट किंवा काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चेला पूर्णविराम दिला. आम्ही कुणाच्या सहभागी होणार नाही, अशा स्पष्ट इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी सोमवारी अजित पवार गटाला दिला.

# 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' च्या गजरात सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेशमुर्तीचे विसर्जन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' च्या गजरात संत्रानगरीतील १३ सार्वजनिक गणेश मंडळाच्या गणेशमुर्तीचे अत्यंत शांततेत विसर्जन पार पडले. यावेळी गणेश विसर्जन मिरवणुकीकरीता प्रचंड पोलिस बंदोबस्तासह ड्रोन कॅमऱ्याने सुद्धा सर्व विसर्जन मिरवणुकीवर प्रशासनाचे लक्ष होते.





अनंत चतुर्थीला शहरातील जामा मज्जीद चौक, आंबेडकर चौक, भवानी चौक, कुबडे चौक ते मेनरोड मार्गाने सर्वच सार्वजनिक गणेश मंडळ मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते. यावर्षी ढोल, ताशे, लाऊडस्पिकरसह विविध वाद्यांनी वरूड शहरातील विसर्जन मिरवणुका गाजल्या. अनंत चतुर्थीला जामा मस्जिद समोरुन मोठा भाजीबाजार परीसरातील आनंद सांस्कृतिक गणेश मंडळाची विर्सर्जन मिरवणुक दुपारी ३ वाजता तर देशमुख पुरा परीसरातील श्री गणेश मंडळाची विसर्जन मिरवणुक दुपारी ३:३० वाजता अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पुढे मार्गस्त झाल्या. यावेळी ड्रोन कॅमऱ्यासह प्रचंड पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी उमेश पाटील, तहसिलदार रामदास शेळके, ठाणेदार अशोक जाधव, नायबतहसीलदार पंकज चव्हाण, नगर परिषदेचे मुख्याधिकारी गजानन भोयर यांचेसह मोर्शी, बेनोडा, शेंदुरजनाघाटचे ठाणेदार, होमगार्ड, राज्य राखीव दलाची तुकडी आदी शेकडो पोलिस कर्मचारी या बंदोबस्तामध्ये सहभागी झाले होते. तर शांतता कमेटीचे सदस्य व माध्यमांचे प्रतिनिधी सुध्दा उपस्थित होते. जामा मज्जिद समोरुन मोठा भाजीबाजार परिसरातील आनंद सांस्कृतिक गणेश मंडळ आणि देशमुखपुरा परिसरातील श्री.गणेश मंडळ असे एकूण २ मंडळाची विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडली. जामा मस्जिद परिसरातून मिरवणुक शांततेच्या मार्गाने जावी, याकरीता पोलिस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, शांतता कमिटीचे सर्व सदस्य, आजी, माजी नगरसेवक, विविध संघटनांचे पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच प्रसिध्दी माध्यमांचे प्रतिनिधी या ठिकाणी तळ ठोकून उपस्थित होते. जामा मज्जिद समोरुन मिरवणूक पार पडल्यानंतर कुबडे चौक ते केदार चौक पर्यंत सर्वच सार्वजनिक गणेश मंडळाची विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडली. यावेळी आनंद सांस्कृतिक गणेश मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीत राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे व आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर, नगराध्यक्ष ईश्वर सलामे, उपाध्यक्ष कविता





उपरकर, न.प.बांधकाम सभापती जीवन मालपे, शिक्षण समिती सभापती प्राजक्ता चौधरी, आरोग्य समिती सभापती विनय खासबागे, पाणीपुरवठा सभापती अनिता पराते, नियोजन व विकास सभापती पुष्पा पवार, नगरसेवक किरण सावरकर, योगेश्वर खासबागे, सौरभ तिवारी, संदीप देवते, निलेश दुर्गे, गौरव इंगळे, गोपी अढाऊ, जीवन मालपे, मो.निसार, अन्सार बेग, नितेश धुर्वे, नगरसेविका छाया दुर्गे, ज्योती शेगेकर, मनिषा उईके, रेखा काळे, डॉ.प्रांजली कुऱ्हाडे, सिमा कानुगो, भारती माळोदे, भाग्यश्री अधव, तसेच यांनी सुद्धा पारंपरिक वाद्यांच्या तालावर ठेका धरत मनसोक्त आनंद लुटला. या सर्वच सार्वजनिक गणेश मंडळांनी आज दुसऱ्या दिवशी सकाळी शेकदरी प्रकल्पावर गणेश मुर्तीचे विसर्जन केले. यावेळी पोलिस व महसुल प्रशासनाने सर्व गणेश मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नगरसेवक, शांतता समितीचे सदस्य, पत्रकार मंडळीसह नागरीकांचे सहकार्याबद्दल आभार मानले.

### जरुडच्या कला व वाणिज्य महाविद्यालयात

# शिष्यवृत्ती मार्गदर्शन शिबिर उत्साहात संपन्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित कला व वाणिज्य महाविद्यालय येथे समाज कल्याण विभाग, अमरावती आणि महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शिष्यवृत्ती विषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जी.आर.तडस तर समाज कल्याण विभाग, अमरावती येथील प्रमुख अधिकारी तेजस्विनी भोसले या प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी डॉ.विनायक भटकर आणि डॉ.रविकांत महिंदकर उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना तेजस्विनी भोसले यांनी विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या संधींबाबत सतत जागरूक राहण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांनी विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज वेळेत भरुन महाविद्यालयाला सहकार्य करावे, जेणेकरुन पात्र विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्तीचा लाभ मिळेल, असे सांगितले. वेळेवर अर्ज भरल्यास विद्यार्थी आणि महाविद्यालय या दोघांचाही फायदा होतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी डॉ.विनायक भटकर, डॉ.अजय कुकडे, डॉ.रविकांत महिंदकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शशिकांत काळे, निलेश खुरद, महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी अर्चना राऊत, डॉ.प्रज्ञा निंभोरकर, प्रा.ज्योती मरस्कोल्हे, डॉ.पुजा महाले, प्रा.प्रदीप आवारे, प्रा.लिलाधर चौधरी, प्रा.समीक्षा बिडकर, प्रा.रुपाली सवई, प्रा.तेजश्री घोटकर, प्रा.सीमा कानडे, प्रा.श्वेता लोखंडे, प्रा.रेणुका वानखडे, निलेश बंदे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाला रासेयो स्वयंसेवक तनुजा पोकळे, आदित्य उमेकर, किरण खंते, रागिनी बारमासे, कृतिका चरपे, गायत्री भंडारे, कृणाल चव्हाण, पवन धुर्वे, अभिषेक धुर्वे, अजय ढोमणे, ईश्वरी बोहरुपी, ऋतुजा ढोकणे, भूमिका ढोकणे, देवश्री शेंडे, लवकेश नांदणे, हर्षल हिरणवार, पियुष बडोदेकर, वैष्णव नरसिंगकर, यशवंत कुसराम, योगेश कुरवाडे, अक्षय बहुरुपी, चैतन्य रावेकर, चंदन देशमुख, नकुल कुरवाडे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### तिकिटासोबत मूळ ओळखपत्र अनिवार्य

# मध्य रेल्वेची १ ते 31 ऑक्टोबरदरम्यान विशेष तपासणी मोहीम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – तिकिटांचा गैरवापर, सवलतीच्या तिकिटांमधील अनियमितता आणि आरक्षण कोट्याचा गैरवापर रोखण्यासाठी मध्य रेल्वेकडून १ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत प्रवाशांच्या तिकिटांची वैधता तपासण्याबरोबरच सवलतीची तिकिटे, विशिष्ट आरक्षण कोटा तसेच विविध पासच्या आधारे होणाऱ्या प्रवासावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. एकाच पीएनआरवर अनेक प्रवाशांचे आरक्षण असल्यास त्यापैकी किमान एका प्रवाशाकडे रेल्वेच्या नोंदीत नमूद केलेले विहित मूळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. आवश्यक ओळखपत्र सादर करता न आल्यास, लागू नियमांनुसार त्या पीएनआरवरील सर्व प्रवाशांना वैध तिकिटाशिवाय प्रवास करणारे मानले जाऊ शकते आणि त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होऊ शकते. मूळ कागदपत्रेही तपासली जाणार सवलतीच्या दरातील किंवा विशिष्ट आरक्षण कोट्याअंतर्गत तिकीट काढलेल्या प्रवाशांची पात्रता सिद्ध करणारी मूळ कागदपत्रेही तपासली जाणार आहेत.

### डॉ.अभिषेक व डॉ.अंकिता यांच्या

# ओराकेअर दंत चिकित्सालयाला डॉ.वेदप्रकाश मिश्रा यांची भेट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि प्रशासन क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व डॉ.वेदप्रकाश मिश्रा यांनी वरुड येथील ओराकेअर दंत चिकित्सालयाला सदिच्छा भेट देऊन चिकित्सालयाची पाहणी केली.



यावेळी त्यांनी मुखशल्य चिकित्सक डॉ.अभिषेक वानखडे आणि डॉ.अंकिता वानखडे यांच्याशी आत्मियतेने संवाद साधत त्यांच्या कार्याची माहिती जाणून घेतली आणि मोलाचे मार्गदर्शन दिले.

डॉ.अभिषेक यांनी शरद पवार दंत महाविद्यालय, दत्ता मेघे वैद्यकीय विज्ञान संस्था येथून मुखशल्य चिकित्साशास्त्रातील पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. ते वरुड येथे स्वतःच्या ओराकेअर दंत चिकित्सालयाच्या माध्यमातून रुग्णसेवा देत आहेत.

मौखिक कर्करोगाचे निदान व उपचार, चेहरा व जबड्याच्या दुखापती तसेच अस्थिभंगावरील उपचार, दंत रोपण शस्त्रक्रिया आणि विविध प्रकारच्या दंत व मुखशल्य चिकित्सा उपचारांमध्ये डॉ.अभिषेक कार्यरत आहेत. त्यांच्यासोबत डॉ.अंकिता या देखील दंतचिकित्सा क्षेत्रात रुग्णसेवा देत असून दोघेही मिळून वरुड व परिसरातील नागरिकांना आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण दंतचिकित्सा सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत आहेत. भेटी दरम्यान डॉ.मिश्रा यांनी चिकित्सालयातील विविध सुविधांची पाहणी केली. रुग्णसेवेतील गुणवत्ता, आधुनिक उपचारपद्धती, नवीन वैद्यकीय तंत्रज्ञानाचा स्वीकार तसेच वैद्यकीय क्षेत्रातील सातत्यपूर्ण ज्ञानार्जन याबाबत त्यांनी डॉ.अभिषेक आणि डॉ.अंकिता यांच्याशी सविस्तर चर्चा केली.

ग्रामीण आणि निमशहरी भागातील नागरिकांना अत्याधुनिक दंत व मुखशल्य चिकित्सा सेवा त्यांच्या जवळच उपलब्ध करून देण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. रुग्णांशी आपुलकीने वागणे, प्रामाणिकपणे रुग्णसेवा करणे आणि वैद्यकीय व्यवसायातील नैतिक मूल्ये जपणे हे वैद्यकीय क्षेत्रातील महत्त्वाचे आधारस्तंभ असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ.अभिषेक आणि डॉ.अंकिता यांनी डॉ.मिश्रा यांचे स्वागत करुन त्यांचे आशीर्वाद घेतले. आपल्या गुरुतुल्य आणि ज्येष्ठ व्यक्तिमत्त्वाची चिकित्सालयाला लाभलेली ही भेट अत्यंत प्रेरणादायी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. डॉ.मिश्रा यांचे स्नेहपूर्ण शब्द, आशीर्वाद आणि मोलाचे मार्गदर्शन हे डॉ.अभिषेक व डॉ.अंकिता यांच्या पुढील वैद्यकीय वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल. त्यांच्या या सदिच्छा भेटीमुळे ओराकेअर दंत चिकित्सालयाच्या कार्याला नवी ऊर्जा मिळाली असून, भविष्यात वरुड व परिसरातील नागरिकांना अधिक दर्जेदार, आधुनिक आणि सर्वसमावेशक दंतचिकित्सा सेवा देण्याचा संकल्प अधिक दृढ झाला आहे.

# संपादकीय

**{ कुणालाही जिंकायचं असेल तर प्रेमाने जिंका. }**

## सर्जनशीलतेला नवे वळण देणारी कृत्रिम बुद्धिमत्ता

आजच्या तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स ही केवळ तांत्रिक क्षेत्रापुरती मर्यादित राहिलेली नाही. शिक्षण, उद्योग, आरोग्य, व्यवसाय, पत्रकारिता, कला आणि मनोरंजन अशा जवळपास प्रत्येक क्षेत्रात तिचा प्रभाव जाणवू लागला आहे. विशेषतः जनरेटिव्ह आर्टिफिशियल इंटेलिजन्सने लेखन आणि सर्जनशील कार्याच्या पद्धतीत मोठा बदल घडवून आणला आहे. काही क्षणांत मजकूर तयार करणे, कल्पना सुचवणे, भाषांतर करणे, चित्रांची निर्मिती करणे, माहितीचे संकलन करणे आणि लेखन अधिक प्रभावी बनवणे यामुळे सर्जनशील क्षेत्रासमोर नव्या संधींबरोबरच काही महत्त्वाचे प्रश्नही उभे राहिले आहेत. पूर्वी एखादा लेख, कथा, जाहिरात किंवा बातमी तयार करण्यासाठी लेखकाला विषयाचा अभ्यास करून माहिती गोळा करावी लागे, त्यानंतर विचारांची मांडणी, भाषाशैली आणि अंतिम संपादन यासाठी बराच वेळ द्यावा लागे. आज जनरेटिव्ह अखच्या मदतीने या प्रक्रियेतील अनेक टप्पे वेगाने पूर्ण करता येतात. लेखकाला एखाद्या विषयावर सुरुवातीच्या कल्पना हव्या असतील तर अख त्याला विविध दृष्टिकोन देऊ शकते. एखाद्या मजकुराची भाषा सोपी करायची असेल, परिच्छेद अधिक परिणामकारक करायचा असेल किंवा वेगवेगळ्या शैलीत मजकूर तयार करायचा असेल, तरीही अख सहाय्यक ठरू शकते. मात्र येथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो अख लेखन करत आहे की माणसाच्या लेखनाला सहाय्य करत आहे? याचे उत्तर तंत्रज्ञानापेक्षा त्याचा वापर करणाऱ्या व्यक्तीच्या भूमिकेत दडलेले आहे. अखकडे प्रचंड माहितीवर प्रक्रिया करण्याची क्षमता असली, तरी मानवी अनुभव, संवेदना, सामाजिक वास्तवाचे भान आणि एखाद्या विषयाकडे स्वतःच्या दृष्टीने पाहण्याची क्षमता ही सर्जनशीलतेची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे अखचा वापर लेखकाची जागा घेण्यासाठी नव्हे, तर लेखकाच्या क्षमतेला अधिक व्यापक बनवण्यासाठी झाला तर त्याचे परिणाम अधिक अर्थपूर्ण ठरू शकतात. पत्रकारितेच्या क्षेत्रातही हा बदल विशेष महत्त्वाचा आहे. बातमीचे प्राथमिक स्वरूप तयार करणे, मोठ्या प्रमाणातील माहितीचे वर्गीकरण करणे, भाषांतर करणे किंवा शीर्षकांच्या पर्यायांची निर्मिती करणे यामध्ये अख उपयुक्त ठरू शकते. परंतु बातमीची सत्यता तपासणे, घटनांचा संदर्भ समजून घेणे, संबंधित व्यक्तींच्या भूमिकेची पडताळणी करणे आणि समाजहिताच्या दृष्टीने बातमी मांडणे ही जबाबदारी मानवी पत्रकाराचीच राहते. वेग वाढला म्हणून सत्यतेची जबाबदारी कमी होत नाही.




# सोयीच्या बदल्यात वैयक्तिक माहितीची किंमत किती?

**सोयीसाठी तंत्रज्ञान स्वीकारावे, पण त्या सोयीच्या बदल्यात आपली गोपनीयता अनावधानाने गहाण ठेवू नये. कारण माहिती एकदा हातातून निसटली, तर तिच्यावरचे नियंत्रण पुन्हा मिळवणे नेहमीच सोपे नसते.**




आजचे जीवन तंत्रज्ञानाशिवाय कल्पना करणे जवळपास अशक्य झालं आहे. मोबाईलमधील एका क्लिकवर बँकिंग, खरेदी, शिक्षण, मनोरंजन, प्रवास, आरोग्यविषयक माहिती आणि संवादाच्या असंख्य सुविधा उपलब्ध होतात. या सुविधा जीवन अधिक सोपे, वेगवान आणि आरामदायी बनवत असल्या तरी त्यामागे एक महत्त्वाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे या सोयीच्या बदल्यात आपण आपली किती वैयक्तिक माहिती देत आहोत?

डिजिटल युगात व्यक्तीची ओळख केवळ नाव आणि पत्त्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. मोबाईल क्रमांक, ई-मेल, लोकेशन, ऑनलाइन खरेदीची सवय, आवडी-निवडी, शोध इतिहास, संपर्क, छायाचित्रे, आर्थिक व्यवहार आणि विविध डिजिटल सेवांवरील वापराची माहिती हीदेखील महत्त्वाची ठरते. अनेक वेळा एखादे ॲप वापरताना आपण परवानग्या देतो आणि त्या बदल्यात सेवा मिळवतो. मात्र त्या माहितीचा नेमका वापर कसा होतो, ती किती काळ जतन केली जाते आणि ती कोणाशी सामायिक केली जाते, याची पूर्ण कल्पना प्रत्येक वापरकर्त्याला असतेच असे नाही.

'फ्री' सेवा हीदेखील अनेकदा पूर्णपणे मोफत नसते. एखादी सेवा वापरण्यासाठी पैसे द्यावे लागत नसले, तरी वापरकर्त्याची माहिती ही त्या सेवेसाठी मौल्यवान संसाधन असू शकते. डिजिटल प्लॅटफफॉर्म वापरकर्त्यांच्या आवडी आणि वर्तनाचा अभ्यास करून त्यांना विशिष्ट जाहिराती किंवा सामग्री दाखवतात. त्यामुळे सुविधा आणि गोपनीयता यांच्यातील समतोल हा भविष्यातील डिजिटल समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रश्न बनला आहे.

विशेषतः मोबाईल ॲप्स आणि ऑनलाइन सेवांमध्ये "Allow" किंवा "Accept" करण्याची सवय इतकी वाढली आहे की अनेकजण अटी व शर्ती न वाचताच पुढे जातात. वेळ वाचविण्याच्या नादात आपण कोणती माहिती देत आहोत, याकडे दुर्लक्ष होते. काही वेळा आवश्यक नसलेल्या परवानग्याही दिल्या जातात. डिजिटल सुविधांचा वेग जितका वाढतो आहे, तितकीच डिजिटल साक्षरतेची गरजही वाढत आहे.

वैयक्तिक माहितीचा गैरवापर झाल्यास त्याचे परिणाम गंभीर असू शकतात. ओळख चोरी, आर्थिक फसवणूक, बनावट खाते, अनधिकृत संपर्क किंवा वैयक्तिक माहितीचा गैरवापर यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे गोपनीयता हा केवळ तांत्रिक विषय नसून व्यक्तीच्या सुरक्षिततेशी आणि स्वातंत्र्याशी संबंधित विषय आहे.

याचा अर्थ तंत्रज्ञानाचा वापर थांबवावा असा अजिबात नाही. उलट डिजिटल सुविधा समाजासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. प्रश्न आहे तो त्यांच्या वापरातील जागरूकतेचा. कोणत्याही ॲपला कोणती माहिती आवश्यक आहे, कोणती परवानगी अनावश्यक आहे, गोपनीयता सेटिंग्ज काय आहेत आणि आपली माहिती कोणत्या कारणासाठी वापरली जात आहे, याची माहिती घेणे ही प्रत्येक डिजिटल वापरकर्त्याची जबाबदारी आहे.

त्याचबरोबर कंपन्यांची जबाबदारीही तितकीच मोठी आहे. वापरकर्त्यांकडून माहिती घेताना पारदर्शकता असणे आवश्यक आहे. कोणती माहिती घेतली जाते, ती का घेतली जाते आणि तिचा वापर कशासाठी केला जातो, हे स्पष्ट आणि सोप्या भाषेत सांगितले पाहिजे. गोपनीयतेच्या संरक्षणाला केवळ कायदेशीर औपचारिकता न मानता ती विश्वासाची बाब म्हणून पाहिले पाहिजे.

सरकार आणि नियामक संस्थांसमोरही मोठे आव्हान आहे. डिजिटल अर्थव्यवस्था वाढत असताना नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण करणारी यंत्रणा सक्षम असणे गरजेचे आहे. डेटा चोरी किंवा गैरवापराच्या घटनांवर प्रभावी कारवाई होण्याबरोबरच नागरिकांना त्यांच्या माहितीवर अधिक नियंत्रण मिळणे आवश्यक आहे.

शेवटी प्रश्न तंत्रज्ञान चांगले की वाईट हा नाही. प्रश्न असा आहे की तंत्रज्ञानाचा वापर करताना आपली माहिती आणि गोपनीयता यांची किंमत आपण किती ओळखतो. एका क्लिकवर मिळणारी सुविधा आकर्षक असते; परंतु त्यासाठी आपण काय गमावत आहोत, याचा विचार करणेही तितकेच आवश्यक आहे.

डिजिटल युगात माहिती ही नवी संपत्ती बनली आहे. त्यामुळे 'सोय मिळतेय ना, मग माहिती देऊ' अशी मानसिकता बदलण्याची वेळ आली आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या वैयक्तिक माहितीबाबत सजग राहणे, कंपन्यांनी पारदर्शकता राखणे आणि यंत्रणांनी प्रभावी संरक्षण देणे या तीनही गोष्टी एकत्र आल्यासच डिजिटल प्रगती सुरक्षित ठरेल.

# दूरस्थ काम : रोजगाराचे भविष्य की नव्या आव्हानांची सुरुवात?

**तंत्रज्ञानाने कार्यालयाची भिंत दूर केली आहे; आता रोजगारव्यवस्थेनेही काम आणि जीवन यांच्यातील संतुलन अधिक संवेदनशीलपणे जपण्याची गरज आहे. दूरस्थ कामाचे खरे यश 'घरून काम' करण्यात नसून 'मानवी गरजा लक्षात घेऊन काम' करण्यात आहे.**

कोरोना महामारीपूर्वी घरून काम करणे ही संकल्पना काही विशिष्ट व्यवसाय आणि कंपन्यांपुरती मर्यादित होती. मात्र महामारीच्या काळात जगभरातील उद्योगांना अचानक घरून काम करण्याचा पर्याय स्वीकारावा लागला आणि कामाच्या पारंपरिक पद्धतीला मोठे वळण मिळाले. संगणक, इंटरनेट आणि डिजिटल साधनांच्या मदतीने कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित न राहता काम करणे शक्य आहे, हे मोठ्या प्रमाणावर सिद्ध झाले. त्यानंतर 'वर्क फ्रॉम होम', 'रिमोट वर्क' आणि 'हायब्रिड वर्क' या संकल्पना रोजगाराच्या चर्चेच्या केंद्रस्थानी आल्या. आता मात्र प्रश्न असा आहे की, दीर्घकाळासाठी दूरस्थ काम कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी आणि रोजगाराच्या दृष्टीने खरोखरच अधिक चांगले आहे का?

दूरस्थ कामाचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे कामाच्या ठिकाणाची बंधने कमी होणे. दररोज कार्यालयात जाण्यासाठी लागणारा प्रवास, वाहतूक कोंडी, वेळ आणि खर्च यापासून कर्मचाऱ्यांची सुटका होते. विशेषतः मोठ्या शहरांमध्ये दोन-तीन तासांचा प्रवास करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ही सुविधा महत्त्वाची आहे. वाचलेला वेळ कुटुंबासाठी, विश्रांतीसाठी किंवा वैयक्तिक कामांसाठी वापरता येतो. त्यामुळे काम आणि वैयक्तिक आयुष्य यांच्यात अधिक चांगला समतोल साधण्याची शक्यता निर्माण होते.

दूरस्थ कामामुळे रोजगाराच्या संधींचे भौगोलिक बंधनही काही प्रमाणात कमी झाले आहे. एखाद्या छोट्या शहरात किंवा ग्रामीण भागात राहणाऱ्या व्यक्तीला मोठ्या शहरातील कंपनीसाठी काम करण्याची संधी मिळू शकते. यामुळे रोजगाराचे केंद्रीकरण कमी होण्यास मदत होऊ शकते. कंपन्यांनाही विशिष्ट शहरापुरते मनुष्यबळ शोधण्याची आवश्यकता राहत नाही. कौशल्य असलेली व्यक्ती देशाच्या किंवा जगाच्या कोणत्याही भागातून काम करू शकते, ही डिजिटल अर्थव्यवस्थेची महत्त्वाची वैशिष्ट्ये ठरत आहेत.



महिलांसाठीही दूरस्थ काम काही परिस्थितींमध्ये उपयुक्त ठरू शकते. घर आणि कामाच्या जबाबदाऱ्या सांभाळताना लवचिक वेळापत्रक मिळाल्यास रोजगार टिकवून ठेवणे सोपे होऊ शकते. दिव्यांग व्यक्ती, प्रवासाच्या अडचणी असलेले कर्मचारी किंवा विशिष्ट कौशल्य असलेले पण रोजगाराच्या केंद्रांपासून दूर राहणारे लोक यांनाही दूरस्थ कामाच्या संधींचा फायदा होऊ शकतो. त्यामुळे रिमोट वर्क हे रोजगार अधिक समावेशक करण्याचे एक साधन ठरू शकते.

मात्र दूरस्थ कामाची दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. घर आणि कार्यालय यांच्यातील भौतिक सीमा नाहीशी झाल्यामुळे कामाचा वेळ वाढण्याची शक्यता असते. कार्यालय बंद करण्याची वेळ स्पष्ट नसल्याने अनेक कर्मचारी कामाचे संदेश, ई-मेल किंवा ऑनलाइन बैठका दिवसाच्या कोणत्याही वेळी हाताळत राहतात. परिणामी विश्रांती आणि काम यांच्यातील सीमा धूसर होऊ शकते. लवचिकता ही सुविधा असली तरी तिचे रूप सतत उपलब्ध राहण्याच्या अपेक्षेत बदलले, तर त्याचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर आणि जीवनशैलीवर होऊ शकतो.

मानवी संवाद हा कार्यालयीन जीवनाचा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे. सहकाऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद, अनौपचारिक चर्चा, एकत्रित समस्या सोडवणे आणि टीमचा भाग असल्याची भावना या गोष्टी पूर्णपणे ऑनलाइन माध्यमातून निर्माण करणे नेहमीच सोपे नसते. विशेषतः नव्याने नोकरीत आलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वरिष्ठ आणि सहकाऱ्यांकडून शिकण्याच्या संधी प्रत्यक्ष कार्यालयीन वातावरणात अधिक सहज मिळू शकतात. त्यामुळे दूरस्थ कामामुळे सामाजिक संपर्क कमी होण्याची शक्यता आणि त्यातून निर्माण होणारी एकाकीपणाची भावना याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही.

रोजगाराच्या स्थैर्याचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. दूरस्थ कामामुळे कंपनीला कार्यालयीन जागा आणि काही पायाभूत खर्च कमी करता येतो. परंतु त्याच वेळी कर्मचारी आणि कंपनी यांच्यातील प्रत्यक्ष संबंध कमी होऊ शकतात. काही व्यवसायांमध्ये दूरस्थ पद्धतीमुळे देशाच्या सीमा ओलांडून मनुष्यबळ उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे कर्मचाऱ्यांसाठी स्पर्धा वाढण्याची शक्यता आहे. एका बाजूला जगभरातील रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, तर दुसऱ्या बाजूला जागतिक पातळीवरील स्पर्धेलाही सामोरे जावे लागते. यामुळे भविष्यात रोजगार टिकवण्यासाठी केवळ पदवी पुरेशी राहणार नाही. डिजिटल कौशल्य, संवादकौशल्य, वेळेचे नियोजन, स्वयंशिस्त आणि सतत नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची क्षमता अधिक महत्त्वाची ठरणार आहे. रिमोट वर्कमुळे कर्मचाऱ्यांच्या कामाचे मूल्यांकनही अनेकदा परिणामांवर आधारित होण्याची गरज निर्माण होते. कार्यालयात किती तास बसला यापेक्षा कोणते काम किती प्रभावीपणे पूर्ण केले, याला महत्त्व देणे ही व्यवस्थापनाची नवी दिशा ठरू शकते.

तंत्रज्ञानाच्या दृष्टीनेही काही प्रश्न गंभीर आहेत. घरून काम करताना इंटरनेटची गुणवत्ता, संगणकाची उपलब्धता, डेटा सुरक्षा आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण या बाबी महत्त्वाच्या ठरतात. प्रत्येक कर्मचाऱ्याला समान डिजिटल सुविधा उपलब्ध नसतील तर दूरस्थ कामाच्या संधींमध्ये असमानता निर्माण होऊ शकते. त्यामुळे रिमोट वर्कला केवळ 'लॅपटॉप आणि इंटरनेट' इतक्या साध्या समीकरणात पाहता येणार नाही.

याच पार्श्वभूमीवर 'हायब्रिड वर्क' ही पद्धत अनेक संस्थांसाठी मध्यममार्ग ठरू शकते. काही दिवस कार्यालयात आणि काही दिवस घरून काम केल्यास दोन्ही पद्धतींचे फायदे मिळवण्याचा प्रयत्न करता येतो. प्रत्यक्ष भेटींमधून टीमवर्क, प्रशिक्षण आणि संस्थात्मक संस्कृती टिकवता येते, तर घरून कामाच्या दिवसांमध्ये प्रवासाचा वेळ वाचवता येतो आणि कामात काही प्रमाणात लवचिकता मिळते. मात्र कोणती पद्धत योग्य आहे हे उद्योगाचे स्वरूप, कामाचा प्रकार आणि कर्मचाऱ्यांच्या गरजा यावर अवलंबून असते. मानसिक आरोग्याच्या संदर्भातही एकच निष्कर्ष सर्व कर्मचाऱ्यांना लागू करता येणार नाही. काही व्यक्तींना घरून काम केल्यामुळे अधिक स्वातंत्र्य, कमी प्रवास आणि चांगला वेळेचा समतोल मिळू शकतो. तर काहींना कार्यालयातील सामाजिक वातावरण, स्पष्ट वेळापत्रक आणि सहकाऱ्यांचा प्रत्यक्ष संपर्क अधिक उपयुक्त वाटू शकतो. त्यामुळे 'रिमोट वर्क म्हणजे मानसिक आरोग्यासाठी चांगले' किंवा 'रिमोट वर्क म्हणजे मानसिक आरोग्यासाठी वाईट' असा सरसकट निष्कर्ष काढण्याऐवजी कामाच्या परिस्थितीचा आणि व्यक्तीच्या गरजांचा विचार करणे आवश्यक आहे. कंपन्यांची भूमिका येथे अत्यंत महत्त्वाची आहे. दूरस्थ कर्मचाऱ्यांवर सतत ऑनलाइन राहण्याचा दबाव टाकण्याऐवजी स्पष्ट कामाचे तास निश्चित करणे, अनावश्यक बैठका कमी करणे, योग्य संवादव्यवस्था निर्माण करणे आणि कामगिरीचे मूल्यांकन पारदर्शक पद्धतीने करणे आवश्यक आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# शालार्थ आयडी घोटाळ्याचा तपास वेगाने ! ४० पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची १० पथके तैनात

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*




**नाशिक** – बहुचर्चित शालार्थ आयडी घोटाळ्याचा तपास आता अधिक व्यापक करण्यात आला असून, नाशिक शहर पोलिसांच्या विशेष तपास पथकाने तपासाची व्याप्ती वाढवली आहे. नाशिक विभागातील बनावट शालार्थ आयडी प्रकरणात आतापर्यंत ८४१ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आयडी संशयास्पद असल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणातील सर्वाधिक ६३८ संशयित जळगाव जिल्ह्यातील असल्याचे समोर आले आहे. प्रकरणाच्या तपासासाठी नाशिक, जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये तब्बल ४० पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची १० विशेष पथके कार्यरत करण्यात आली आहेत. आठ प्रमुख संशयितांना अटक शालार्थ आयडी घोटाळ्याप्रकरणी आतापर्यंत नितीन उपासनी, माजी शिक्षणाधिकारी शशिकांत हिंगोणेकर, संजय गरूड, प्रशांत वाडीले, किरण पाटील, राहुल पवार, दीपक गरूड आणि तुषार साळुंके या आठ प्रमुख संशयितांना अटक करण्यात आली आहे. सेवानिवृत्त शिक्षण उपसंचालक नितीन उपासनी गेल्या काही महिन्यांपासून नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८६८/२०२६** **ने.ता.०३/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) चंद्रकला रामचंद्र देशमुख, वय अं.७८ वर्ष, धंदा-काही नाही
२) अनिता दिलीपराव मोहोड, वय अं.५० वर्ष, धंदा-मजुरी
३) पंचफुला संतोषराव देशमुख, वय अं.५३ वर्ष, धंदा-मजुरी
४) कैलास अजाबराव देशमुख, वय अं.५९ वर्ष, धंदा-मजुरी
५) दिपक अजाबराव देशमुख, वय अं.५५ वर्ष, धंदा-मजुरी
अर्जदार क्र.१ ते ५ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
६) ज्योती प्रल्हाद ठाकरे, वय अं.३५ वर्ष, धंदा-मजुरी
रा.घाटबिरोली, ता.मुलताई, जि.बैतुल

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मय्यत माधव गणुजी देशमुख, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८७१/२०२६** **ने.ता.०३/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्री.प्रकाश मारोतराव वाघ, वय अं.६४ वर्ष, धंदा-शेती
२) कु.आकांशा प्रकाश वाघ, वय अं.२२ वर्ष, धंदा-शिक्षण
३) कु.अंकीता प्रकाश वाघ, वय अं.२० वर्ष, धंदा-शिक्षण
४) कु.तनुजा प्रकाश वाघ, वय अं.१८ वर्ष, धंदा-शिक्षण
सर्व रा.मेंढी, पो.उदापूर, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत छाया प्रकाश वाघ, रा.मेंढी, पो.उदापूर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२८/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८५६/२०२६** **ने.ता.२९/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती रोशनी सागर मालपे, वय अं.३४ वर्ष, धंदा-घरकाम
२) सौ.ललिता मोहन मालपे, वय अं.७४ वर्ष, धंदा-घरकाम
क्र.१ व २ रा.वार्ड क्र.५, गुजरी बाजार लोणी, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **सागर मोहनराव मालपे, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधिशसाहेब, ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८१३/२०२६** **ने.ता.२३/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) प्रिया राजू गाडगे, वय अं.३८ वर्ष, धंदा-घरकाम
२) कु.देवेश्री राजू गाडगे, वय अं.१० वर्ष, धंदा-शिक्षण
३) कु.साईश्री राजू गाडगे, वय अं.०३ वर्ष, धंदा-काही नाही
४) सुमित्रा वामनराव गाडगे, वय अं.७३ वर्ष, धंदा-घरकाम
(अर्जदार क्र.१ ही.अर्जदार क्र.२, ३ करीता अ.पा.क.म्हणून आई आहे.) सर्व रा.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

**अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ८ चे १८२७ नूसार वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत.**

अर्जदार नम्रपणे विद्यमान न्यायालयात अर्ज दाखल करतात तो येणेप्रमाणे, **१.**अर्जदार हे उपरोक्त लिखीत पत्त्यावर राहत असुन कायद्याचे तंतोतंत पालन करणारे प्रतिष्ठीत नागरीक आहे. **मयत राजू वामनराव गाडगे** यांची अर्जदार क्र.१ ही पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ ह्या मुली आहे, तसेच **मयत राजू वामनराव गाडगे** यांची अर्जदार क्र.४ ही आई आहे. **२.मयत राजू वामनराव गाडगे यांचा मृत्यु दिनांक १४/१०/२०२५ रोजी धनोडी** येथे आजारामुळे झालेला आहे. मयंत व्यक्ती हे रा.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती येथील रहीवासी होते, आणि ते मजूरी व्यवसाय करुन आपल्या कुटुंबासह राहत होते. **३.मयत राजू वामनराव गाडगे** यांचे कायदेशीर वारस हे पुढीलप्रमाणे अर्जदार आहे.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# 'ठाकरेंवर टीका करून तुमची पापं झाकली जाणार नाहीत'; उदय सामंतांवर भास्कर जाधव संतापले, म्हणाले, 'मुख्यमंत्र्यांना जाब विचारणार का?'

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – राज्य सरकारने शेतकऱ्यांच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेत राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतर याबाबतचा शासन निर्णय काढण्यात आला असून महाराष्ट्रातील तब्बल ७५ टक्के भागात दुष्काळ जाहीर झाला आहे. सरकारने दुष्काळ जाहीर केल्यानंतर ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी यावर प्रतिक्रिया देत काही प्रश्न उपस्थित केले होते. यावरूनच मंत्री उदय सामंत यांनी आदित्य ठाकरेंवर निशाणा साधला होता. घरातून आता बाहेर पडलेत, त्यांचे अभिनंदन, असे उदय सामंत म्हणाले होते. आता उदय सामंत यांच्या या टीकेला ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांनी अतिशय आक्रमक भाषेत प्रत्युत्तर दिले आहे. उदय सामंत यांच्यावर जोरदार हल्लाबोल करताना भास्कर जाधव म्हणाले की, बाजार बुणगे सत्ताधाऱ्यांना शेतकऱ्यांचे दु:ख कळणार नाही, माझ्या मतदारसंघातील शेतकऱ्याचे अश्रू पुसायला सरकारला भाग पडणार. ठाकरे घरातून बाहेर पडत नाहीत असं सत्ताधारी लोकांचे तुणतुणे कायम असतं, पण उदय सामंत यांनी ठाकरेंना बोलण्यापेक्षा दुष्काळग्रस्त भागात जिल्ह्यातले केवळ तीन तालुके आलेत याची जबाबदारी घेतली पाहिजे. मुख्यमंत्र्यांना सामंत जाब विचारणार आहेत का?

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर ( प्रभारी ), सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७९७/२०२६** **ने.ता.२२/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) जयश्री धनराज फरकाडे, वय अं.३७ वर्ष, धंदा-घरकाम
२) लावण्या धनराज फरकाडे, वय अं.१५ वर्ष, धंदा-शिक्षण
३) कु.पल्लवी धनराज फरकाडे, वय अं.११ वर्ष, धंदा-शिक्षण
४) विमल सुरेशराव फरकाडे, वय अं.७३ वर्ष, धंदा-घरकाम
अर्जदार क्र.१ ही.अर्जदार क्र.२ व ३ करीता अ.पा.क.म्हणून आई आहे. सर्व रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत धनराज सुरेशराव फरकाडे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१५/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर ( प्रभारी ) दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७९८/२०२६** **ने.ता.२३/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) आशा किसन फरकाडे, वय अं.६३ वर्ष, धंदा-घरकाम
२) राहुल किसन फरकाडे, वय अं.४३ वर्ष, धंदा- शेती
रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत किसना महादेवराव फरकाडे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१५/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८२५/२०२६** **ने.ता.३०/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) कमला भगवंत चौधरी, वय अं.७४ वर्ष, धंदा-गृहीणी
२) रवि भगवंतराव चौधरी, वय अं.५१ वर्ष, धंदा- शेती
दोन्ही रा.शिवाजी नगर, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत भगवंत सुर्यभान चौधरी, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२४/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८२६/२०२६** **ने.ता.२७/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१)श्रीमती किर्ती ईश्वर देशमुख, वय अं.५८ वर्ष, धंदा-घरकाम
२) धिरज ईश्वर देशमुख, वय अं.३० वर्ष, धंदा- शेती
क्र.१ व २ रा.चांदस (वाठोडा), ता.वरुड, जि.अमरावती
३) सरोज अतुल झरबडे, वय अं.३८ वर्ष, धंदा- घरकाम
रा.लोटस अपार्टमेंट, अर्जुन नगर, अमरावती, जि.अमरावती
४) जया भुषण गायकी, वय अं.३६ वर्ष, धंदा-घरकाम
रा.देशमुखपुरा वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत ईश्वर विठ्ठल देशमुख, रा.चांदस ( वाठोडा ), ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२३/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# ‘एसआयआर’ प्रक्रियेत स्थानिक अधिकाऱ्यांचे अधिकार पूर्ववत करा

## मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांचे केंद्रीय आयोगाला पत्र

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) प्रक्रियेत स्थानिक पातळीवरील निवडणूक नोंदणी अधिकाऱ्यांना (ईआरओ) कायद्याने दिलेले अधिकार वापरता यावेत, यासाठी ‘ईसीआयनेट’ प्रणालीमध्ये आवश्यक बदल करावेत, अशी मागणी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी आयोगाला पत्र पाठविले असून, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांना सुनावणीपासून सूट, वंचित घटकांसाठी अतिरिक्त कागदपत्रांना मान्यता आणि निर्णय घेण्याचे अधिकार ’ईआरओ’ पातळीवर कायम ठेवण्यासह चार प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. एसआयआर प्रक्रियेदरम्यान ’ईसीआयनेट’ सॉफ्टवेअरमुळे स्थानिक अधिकाऱ्यांच्या अधिकारांवर मर्यादा येत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर चोकलिंगम यांनी हे पत्र पाठविल्याचे वृत्त आहे.

# जम्मू-काश्मीर विधानसभेत पूर्ण राज्याचा दर्जा देण्याचा ठराव



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**श्रीनगर** – जम्मू-काश्मीर विधानसभेत पूर्ण राज्याचा दर्जा तातडीने देण्याची मागणी करणारा ठराव विरोधी पक्ष भाजपच्या प्रचंड गदारोळात आणि सभात्यागात मंजूर झाला आहे.

मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी गेल्या शुक्रवारी हा ठराव मांडला होता. मात्र, अनेक सदस्यांना यावर बोलण्याची इच्छा असल्याने तो पुढे ढकलण्यात आला होता. शुक्रवारी आणि सोमवारी दोन्ही दिवशी भाजपने या ठरावाला तीव्र विरोध केला. भाजपच्या आमदारांनी अध्यक्षांच्या मोकळ्या जागेत (वेल) धाव घेऊन कामकाज पत्रिका फाडल्या तसेच सभागृहातच ’मॉक’ (संसदीय प्रतिकृती) कामकाज चालवून विरोध दर्शवला.

# दुष्काळ पाहणीसाठी महाराष्ट्रात पथक पाठवणार

## केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांची घोषणा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**नवी दिल्ली** – कर्नाटक आणि महाराष्ट्रातील दुष्काळाच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्र सरकार दोन्ही राज्यांमध्ये पथके पाठवणार असल्याचे केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सोमवारी सांगितले.

आगामी रब्बी (हिवाळी) हंगामाच्या तयारीवरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेला संबोधित करताना चौहान म्हणाले की, हवामान बदलाचे परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहेत आणि नुकत्याच संपलेल्या खरीप (उन्हाळी/पावसाळी) हंगामावर त्याचा प्रभाव जाणवला आहे. दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आम्ही ३ ऑक्टोबर रोजी कर्नाटकात एक केंद्रीय पथक पाठवू. मी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांशीही बोललो आहे, त्यांनीही चिंता व्यक्त केली आहे, आणि आम्ही तेथेही केंद्रीय पथक पाठवू. या संकटाचा सामना करणाऱ्या राज्यांना मी माझ्या टीमसह वैयक्तिकरीत्या भेट देईन, असे ते म्हणाले.

कर्नाटकाने दुष्काळ जाहीर केला आहे. महाराष्ट्राने साधारणपणे दोन-तृतीयांश भागात दुष्काळ जाहीर केला आहे, असे मंत्र्यांनी सांगितले. ते म्हणाले की, महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश या राज्यांवर दुष्काळाचे सावट पसरले आहे. चौहान यांनी महाराष्ट्र आणि कर्नाटकातील अधिकाऱ्यांसह सर्व राज्य अधिकाऱ्यांना या भागातील खरीप पिकांच्या धोक्यांकडे लक्ष देण्याचे आवाहन केले.

# राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२६ पुढे ढकलली

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**मुंबई** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. २०२६ च्या राज्यसेवा मुख्य परीक्षा आणि इतर परिक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतलेला आहे.

२०२५ मध्ये झालेल्या राज्यसेवा मुख्य परिक्षेच्या उत्तरपत्रिकांचे पुन:र्मुल्यांकन करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. काही तासांपूर्वीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्रसिद्धीपत्रक काढून हा महत्त्वाचा निर्णय जारी करण्यात आलेला आहे.

गेल्या काही महिन्यांपूर्वी राज्यामध्ये झालेल्या पेपरफुटीच्या प्रकरणामुळे हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आलेला आहे. अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थी संघटनांकडून २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परिक्षेच्या मुल्यांकनाबद्दल आक्षेप नोंदवण्यात आला होता. हाच आक्षेप लक्षात घेत, राज्य सेवा मुख्य परिक्षा- २०२५ च्या उत्तर पत्रिकांचे पुन:र्मुल्यांकन करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे २०२६ मध्ये होणारी राज्यसेवा मुख्य परीक्षा आणि इतर परिक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतलेला आहे.

वारंवार पेपरफुटीचे प्रकरण होत असल्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा घडवून आणण्याची मागणी अनेक विद्यार्थी संघटनांकडून केली जात आहे. इतकंच नाही तर, विद्यार्थ्यांकडून आणि पालकांकडूनही आयोगाच्या अध्यक्षांनी या कथित घोटाळ्यांची जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणीही केली जात आहे.

# १४ फूट उंच झोपड्यांच्या कारवाईवरून विरोधक आक्रमक

## काँग्रेस, ठाकरेंच्या शिष्टमंडळांनी घेतली आयुक्तांची भेट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुंबईतील १४ फूटपेक्षा अधिक उंचीच्या झोपड्यांवर प्रस्तावित कारवाईवरून पालिका सभागृहात सोमवारी वातावरण तापले. पालिकेच्या या कारवाईमुळे हजारो कुटुंबे बेघर होण्याची शक्यता असल्याचा दावा करत उबाठा आणि काँग्रेसच्या शिष्टमंडळांनी पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांची भेट घेतली. दुसरीकडे, पालिका सभागृहातही या मुद्द्यावरून सर्वपक्षीय नगरसेवकांनी प्रशासनाला जाब विचारला.

१४ फुटावरील झोपड्यांवर कारवाई करणार तर १४ फुटापर्यंत झोपड्या झाल्या त्या संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने झाल्या आहेत. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार, असा सवाल स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी सभागृहात उपस्थित केला.

आधी पुनर्वसन करा! काँग्रेसच्या शिष्टमंडळानेही आयुक्तांची भेट घेतली. मुंबई काँग्रेस अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड, आमदार अस्लम शेख, आमदार ज्योती गायकवाड, गटनेते अशरफ आझमी यांच्यासह नगरसेवकांनी पूर्वी १८ फुटांपर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याची भूमिका असताना आता १४ फुटांवरील बांधकामांवर कारवाई का, असा सवाल केला. धोकादायक किंवा अनधिकृत बांधकामांचे समर्थन नसले तरी कारवाईपूर्वी पुनर्वसनाचा विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली.

# कच्चा चिवड्यात चक्क मृत पाल : सात जणांना विषबाधा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**चंद्रपूर** – चंद्रपूर शहरातून एक अतिशय खळबळजनक बातमी समोर आली आहे. चंद्रपूर बसस्थानक रस्त्यावरील एका दुकानातून खरेदी केलेला कच्चा चिवडा खाल्ल्यानंतर सात जणांना विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. चिवड्याच्या पाकिटात मृत पाल आढळून आल्याचा दावा बाधितांनी केला असून उपचारानंतर सातही जणांची प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती आहे. सोमवारी दुपारच्या सुमारास ही घटना घडली होती. त्यानंतर बाधितांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विषबाधा झालेल्या सर्व सातही रुग्णांवर उपजिल्हा रुग्णालयात उपचार केल्यानंतर त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. अन्न विषबाधेचे मुख्य कारण वैद्यकीय अहवाल आणि नमुन्यांच्या तपासणीनंतरच स्पष्ट होईल, अशी प्रतिक्रिया वरोराच्या उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ.केतकी शेंडे यांनी दिली आहे.

